# नियुक्ती सुचना क्र. १६

दि. ०४/०४/२०२३

## -: मुंबई पोलीस शिपाई/मुंबई पोलीस शिपाई चालक भरती २०१९ :-

-:दि. १०/०४/२०२३ रोजी सकाळी ०९:०० वा. नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना:-

विषय :- मुंबई पोलीस शिपाई / मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९
पोलीस शिपाई / पोलीस शिपाई (चालक) पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत...

संदर्भ :- १) मुंबई पोलीस शिपाई भरती अंतरिम निवड यादी प्रसिध्द दि. ०५/०१/२०२२.
२) मुंबई पोलीस शिपाई (चालक) अंतरिम निवड यादी प्रसिध्द दि. ३०/१०/२०२१.

उपरोक्त संदर्भानुसार मुंबई पोलीस शिपाई/ मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९ प्रक्रिया पार पाडण्यात आली. संदर्भ क्र. १ व ४ नुसार कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून गुणवत्तेनुसार पोलीस शिपाई यांची तात्पुरती अंतरिम निवड यादी/अंतरिम प्रतिक्षा यादी (Provisional Select/Waiting List) जाहिर करण्यात आली आहे. तद्नंतर उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या सोबतच्या यादीतील उमेदवारांना कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहुन नियुक्ती पत्र स्विकारण्यासाठी बोलविण्यात येत आहे. नियुक्ती पत्र स्विकारण्याकरिता बोलविण्यात आले म्हणुन नियुक्तीचा अधिकार प्राप्त झाला असे समजण्यात येवु नये. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर निवड रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास आहेत. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच खाली नमुद केलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे.

१) नियुक्तीसाठी येताना कागदपत्र पडताळणीकरिता खालील नमूद प्रमाणपत्र न चुकता सोबत आणणे आवश्यक आहे :-

- १) भरती ओळखपत्र (मैदानी चाचणी/ लेखी परिक्षेचे)
- २) भरती प्रक्रियेसाठी यापूर्वी जमा न केलेले सर्व मुळ कागदपत्र
  उदा. शैक्षणिक/ डोमीसाईल/ जात प्रमाणपत्र/ नॉन क्रिमिलेअर/ होमगार्ड/ प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त इ. संबंधित मुळ प्रमाणपत्र.
- ३) ०४ पासपोर्ट साईज फोटो.
- ४) आधार कार्ड व पॅन कार्ड.
- ५) दैनंदिन गरजेच्या वस्तु घेवून पोलीस प्रशिक्षणाच्या तयारीने न चुकता हजर रहावे.

सोबत नियमीत वापरण्यास लागणारे कपडे, विश्रांतीकरिता साहित्य (दरी, मच्छरदाणी, पांघरुण), ताट-वाटी, तांब्या, ग्लास, दाढीचे साहित्य (पुरुषांकरिता), २ खाकी हाफ पॅन्ट, २ पांढऱ्या बनियान, कॅनव्हास शुज (१ जोडी), खाकी नायलॉन सॉक्स (२ जोडी), २०० पानी वह्या (२), १ पेन, गांधी टोपी, १ लोखंडी बकेट, महिलांकरिता २ ट्राऊझर, २ पांढरे टी-शर्ट इ. साहित्य सोबत आणावे. सोबत 'मेस ॲडव्हांन्स' ₹. २,०००/- घेवुन यावे. तसेच संपर्कासाठी दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत ठेवावा. **उमेदवाराने आपल्यासोबत चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा. सोन्याचे दागिने इ. वस्तू आणू नयेत. अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

**विशेष सुचना :-**

१) भरती ओळखपत्र नसल्यास अथवा अपूर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे असल्यास नियुक्ती देण्यात येणार नाही. नियुक्तीसाठी दिलेल्या दिनांकाच्यावेळी गैरहजर राहिल्यास पूर्व सूचना न देता निवड रद्द करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व न चुकता हजर रहावे. सदरची पोलीस शिपाई पदाची अस्थायी नियुक्ती ही नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीच्या अधिन आहे. व सदरहू अटी व शर्ती उमेदवारांस बंधनकारक आहेत.

२) "कोविड-१९" अनुषंगाने सर्व उमेदवारांनी नियुक्तीपत्र स्विकारण्यासाठी येतांना २४ तासाच्या आतील 'ॲन्टीजेन चाचणी' अहवालाची प्रिंट सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच उमेदवारांनी नियुक्तीपत्र स्विकारण्यासाठी हजर होतेवेळी तसेच प्रशिक्षण कालावधीत शासनाच्या सर्व "कोविड-१९" विषयक मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणे अनिवार्य असेल.

**टिप :- नियुक्तीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवाराने भरती निकषांची/अर्हतेची पुर्तता न केल्याचे आढळुन आल्यास नियुक्ती दिली जाणार नाही व निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.**

Satpute

पोलिस आयुक्त मुंबई

**( तेजस्वी सातपुते )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२)
पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई.

पोलिस आयुक्त मुंबई

# मुंबई पोलीस शिपाई / मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९

(पोलीस शिपाई व पोलीस शिपाई (चालक) पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत)

दि. १०/०४/२०२३ सकाळी ०९:०० वा नियुक्तीसाठी 'पोलीस संकुल नायगांव' नायगांव पोलीस मुख्यालय, (पोलीस भरती संगणक कक्ष), नायगांव, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४ येथे कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहुन बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी

## पोलीस शिपाई

| अ.क्र. | छाती क्रमांक | बैठक क्रमांक | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | २४९८ | २४२३०४१९५३ | मयुरी सुभाष निकम |
| २ | २६५४ | ६११९०९९८७८ | दुर्गा माणिक कुंभार |
| ३ | २७६८ | ६१४९१००८६१ | विशाखा नामदेव म्हस्के |
| ४ | ३८९० | ६५९९१२३०८३ | स्वप्नील पोपट डमाळे |
| ५ | ५०९५ | २९७३०५२०७६ | करण शाम गाडे |
| ६ | ५३६२ | ५१६६०७३०८७ | रितीक पारखिचंद डोगरे |
| ७ | ६१७७ | २४४३१४९३५३ | सचिन किसन पोळ |
| ८ | ६५६९ | १३२१०११५७५ | प्रियंका हरिदास सोटम |
| ९ | ६६१४ | ६१७९१०२२६२ | कोमल वसंत शिंदे |
| १० | ७४९६ | ५८०८०८९१५६ | सुचिता बापु राजगुरु |
| ११ | ८१०३ | ३३०३१४३४८७ | राजेंद्र बाळासोा ढमाळ |
| १२ | ८२०६ | ६४४९१११६००६ | अजिंक्य संतोष चतुर |
| १३ | ९२७९ | ६२४९१०६४८० | प्रशांत प्रकाश गवळी |

## पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९

| अ.क्र. | छाती क्र. | बैठक क्रमांक | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | ७५१ | १०१२१११८७६७ | मिलिंद मानसिंग साळुंखे |